तालुक्यात एकमेव कायम विना अनुदानित महाविद्यालयाला /विद्याशाखांना १००% अनुदान मंजूर करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन आदेश क्रमांक: एनजीसी २००९/(२२५/०९)/ मशि ३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ७ नोव्हेंबर, २००९

पहा : १) शासन निर्णय क्रमांक एनजीसी २००७/(१६४/०७)/ मशि ३, दिनांक ४ फेब्रुवारी, २००८.
२) शासन पत्र क्रमांक एनजीसी २००८/(९७/०८)/मशि३, दिनांक १०.१०.२००८
३) शासन निर्णय क्र. एनजीसी २००८/(९७/०८)/मशि३, दिनांक १४ मे २००९.
४) संचालक, उच्च शिक्षण, यांचे पत्र क्र. एनजीसी २००९/ताएमअनु/ मवि-२/२७५०, दिनांक २ ऑगस्ट, २००९.
५) शासन निर्णय क्रमांक एनजीसी २००७/(१६४/०७)/ मशि ४, दिनांक २६ ऑगस्ट, २००९.

**शासन आदेश :**

दिनांक १७ जून १९९५ च्या शासन निर्णयान्वये ज्या तालुक्यामध्ये एकही अनुदानित महाविद्यालय नाही अशा १० तालुक्यातील महाविद्यालयांना अनुदान तत्वावर आणण्यास शासनाने परवानगी दिली आहे. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २००१ पासून राज्यात कायम विना अनुदानाचे धोरण स्विकारले गेले आहे. राज्यात नवीन तालुक्यांच्या संख्येत वाढ झाली असल्यामुळे ज्या तालुक्यात एकही अनुदानित महाविद्यालय अथवा विद्याशाखा नाही अशा तालुक्यांमध्ये अनुदान तत्वावर मंजुरी देण्याची मागणी पुढे आली होती. त्या अनुषंगाने प्रत्येक तालुक्यात एका महाविद्यालयास / विद्याशाखेस १००% अनुदान तत्वावर मंजूरी देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ४ फेब्रुवारी २००८ अन्वये घेतला आहे.

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित संस्थांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची शासनाने शासन निर्णय क्र. एनजीसी २००८/(९७/०८)/मशि३, दिनांक १४ मे २००९ अन्वये गठीत केलेल्या कार्यबलगटाकडून छाननी करण्यात आली. कार्यबलगटाच्या शिफारशी विचारात घेऊन प्रपत्र 'अ' मधील महाविद्यालयांच्या नावासमोर दर्शविलेल्या विद्यमान विद्याशाखांना

तसेच महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम ८२(५) मधील तरतूदीनुसार प्रपत्र 'ब' मधील नवीन विद्याशाखांना मंजूरीसह शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून १००% अनुदानावर आणण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१. अटी व शर्ती :

१. विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी, अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग ( पूर्णवेळ प्राचार्य / ग्रंथपाल / शिक्षक) नेमणे आवश्यक असून इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात (उदा. स्वतःची इमारत, प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रिडांगण, मुला-मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे इ.). त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी.

२. महाविद्यालयांनी कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

३. संबंधित महाविद्यालयांनी शासन परिपत्रक क्रमांक एनजीसी- ३५९३/५४४३/विशि२, दिनांक २४ सप्टेंबर १९९३ अन्वये विहित केलेले विद्यार्थी संख्येचे निकष पूर्ण करणे आवश्यक आहे. ते पूर्ण न केल्यास पुढील शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालय / विद्याशाखेचे अनुदान बंद करण्यात येईल.

४. संबंधित महाविद्यालयांनी / व्यवस्थापनांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना शासनाने व विद्यापीठाने विहित केलेल्या सेवाशर्ती व वेतनश्रेण्या लागू केलेल्या असल्या पाहिजेत.

५. संबंधित महाविद्यालयांनी शासनाच्या वेळोवेळी निघालेल्या/ निर्गमित होणा-या आदेशांचे / अध्यादेशांचे (विद्यार्थी प्रवेश, गुणवत्ता, संवर्गनिहाय आरक्षण व शिक्षण शुल्क इ.) काटेकोर पालन करणे बंधनकारक राहील.

६. संबंधित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २००९-१० व २०१०-११ मध्ये नॅक ॲक्रेडिएशन प्राप्त करुन घ्यावे..

७. संस्थेत गैरप्रकार, शिक्षक निवडीमध्ये गैरप्रकार, संस्थेच्या पदाधिका-यांवर गुन्हेगारी स्वरुपाचे खटले अशा बाबी प्रलंबित नसल्याबाबत संबंधित संस्था / महाविद्यालयांनी त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे रु.१००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र सादर करावे.

८. संबंधित महाविद्यालयास वेतन अनुदानाशिवाय इतर कोणतेही अनुदान मिळणार नाही.

९. दुर्गम व डोंगराळ ठिकाणी असणा-या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची सोय संस्थेने स्वखर्चाने करावी.

१०. संबंधित महाविद्यालयाचे महालेखापालांकडून / शासनाकडून अनुदानाचे वेळोवेळी लेखापरिक्षण करण्यात येईल.

११. संबंधित महाविद्यालय / विद्याशाखेस संलग्नीकरण देण्यापूर्वी विद्यापीठांनी शासनाने विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता केल्याची खात्री करावी.

यावरील खर्च " मागणी क्र. डब्ल्यू- २, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०४-अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य, (०१) (०१)- अशासकीय वाङ्.मय, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयांना अनुदाने (२२०२ ०८७२), ३५- सहाय्यक अनुदाने (वेतन) या लेखाशिर्षाखाली सन २००९-१० साठी मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

हे आदेश शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००९११०७१५०७५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि.गो. चांदेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
सर्व अकृषी विद्यापीठे
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संबंधित संस्था
निवड नस्ती मशि ४

C:\Documents and Settings\[illegible]

प्रपत्र ब

| अ.क्र. | | | संस्थेचे नांव | महाविद्यालयाचे नांव | अनुदानासाठी शिफारस केलेली विद्याशाखा |
|---|---|---|---|---|---|
| १. | रत्नागिरी | गुहागर | गुहागर एज्युकेशन सोसायटी, गुहागर, जिल्हा-रत्नागिरी | ग.बा. तथा तात्यासाहेब खरे वाणिज्य आणि पार्वतीबाई गुरुपद खेरे कला महाविद्यालय, गुहागर, जिल्हा रत्नागिरी | विज्ञान |
| २. | | मंडणगड | सावित्रीबाई शिक्षण प्रसारक मंडळ, रत्नागिरी | मंडणगड कला आणि वाणिज्य महाविद्यालय, मंडणगड, जिल्हा रत्नागिरी | विज्ञान |
| ३. | सोलापूर | मोहोळ | कै. संभाजीराव गरड शिक्षण प्रसारक मंडळ, मोहोळ, जिल्हा सोलापूर | देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ,जिल्हा सोलापूर | वाणिज्य |
| ४. | जळगांव | बोधवड | दि.बोधवड सार्वजनिक को- ऑप एज्युकेशन सोसायटी लि.बोधवड जि जळगांव | कला व वाणिज्य महाविद्यालय बोधवड ता बोधवड जि जळगांव | विज्ञान |
| ५. | हिंगोली | सेनगांव | श्री गजानन शि.प्र.म.एलदरी कॅम्प ता. जिंतूर, जि. परभणी | तोष्णीवाल कला व वाणिज्य महाविद्यालय सेनगांव, जि. हिंगोली | विज्ञान |
| ६. | लातूर | शिरुर अनंतपाळ | गुरु विश्वंभर कृपा बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, लक्कड जवळका, ता.शिरुरअनंतपाळ, जि. लातूर | शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ, जिल्हा लातूर | वाणिज्य-विज्ञान |
| ७. | | जळकोट | जिजामाता बहुउद्देशियशि.प्र.म.पाटोदा (ब) ता जळकोट जि लातूर | संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट जि लातूर | वाणिज्य-विज्ञान |